<u>नि.फौ.ख.– १९१/२०१५</u>
शासन –वि.– अशोक **नि.क्र.१३**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा पुरावा**
**मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | अनिल रखमाजी गायकवाड, |
| वय | – | ६२ वर्षे, |
| व्यवसाय | – | सेवानिवृत्त, |
| राहणार | – | नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर |

(आरोपीतर्फे हजेरी माफीचा अर्ज **(नि.क्र.१२)** दाखल. ओळखीचा वाद उत्पन्न करणार नाही या अटीवर अर्ज मंजूर.)

**<u>सरतपासणी – सहा.सरकारी अभियोक्ता श्री. पी. के. पाटील यांचे मार्फत</u>–**

दि. १८/०१/२०१५ रोजी माझी राहुरी पोलीस ठाणे येथे पोलीस हेड कॉन्सटेबल म्हणून नेमणूक होती. सदरील रोजी मी व इतर पोलीस कर्मचारी पोलीस ठाणे येथे हजर असताना पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी फोनद्वारे आम्हाला कळविले की, राहुरी बु।। येथील राजवाडा परिसरात दातीर मळाजवळ मुळा नदी पात्रात एक ट्रॅक्टर व ट्रॉलीमध्ये चोरुन वाळू भरली जात आहे. सदरील बातमीनुसार मी, पी.एस.आय. शेंगेपल्लू, कॉन्स्टेबल सुरवसे, पो.ना. काळे, पो.कॉ. लगड असे सरकारी वाहनाने दोन पंचासह बातमी मिळालेल्या ठिकाणी सकाळी ११.०० वा. च्या सुमारास पोहोचलो असता वाळु भरणारे इसम ड्रायव्हर सह पळून गेले. तेथे आम्हाला एक महिंद्रा टर्बो ट्रॅक्टर व हिरव्या रंगाची ट्रॉली व त्यामध्ये एक ब्रास वाळु मिळून आली. पोलीस हेड कॉन्सटेबल सुरवसे यांनी

दिसतेपरिस्थितीनुसार पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. सदरील ट्रॅक्टर व ट्रॉली पोलीस ठाणे येथे तपासकामी घेऊन जाण्यात आले. पो.कॉ. लगड यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली. माझा जबाब व पुरवणी जबाब नोंदविण्यात आला. सदरील पुरवणी जबाबात ट्रॅक्टरचा क्रमांक एम.एच.–१७–टी.सी.–१९४ असा असून त्याचा चालक व मालक अशोक दिगंबर भिसे असल्याचे कळाले.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री एस. व्ही. खरडे यांचे मार्फत–**

हे म्हणणे खरे आहे की, दि. १८/०१/२०१५ रोजी सकाळी १०.४५ वा. च्या सुमारास आम्हाला फोनद्वारे बातमी कळाली होती. पोलीस ठाणे ते घटनास्थळ हे अंतर १ किलोमीटर आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाणे हे गजबजलेल्या ठिकाणी असून पोलीस ठाणे ते घटनास्थळ जाण्यास २५ ते ३० मिनिट लागतो. हे म्हणणे खरे नाही की, मुळा नदीचे पात्र खोल असून त्यामध्ये वाहन उतरु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सहसा वाळु चोरी रात्री होतात. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर व ट्रॉली कोणते होते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर मी प्रत्यक्ष हजर नव्हतो व मला घटनेबाबत काहीही माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला दुस–या कार्यवाहीत पंच होण्यास सांगितले असता त्याने नकार दिल्यामुळे सदरील खोटी कार्यवाही त्याच्या विरुध्द करण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द सरतपासात जे काही सांगितले आहे ते खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केली असून

<u>नि.फौ.ख.– १९१/२०१५</u>

शासन –वि.– अशोक **नि.क्र.१३**

आजरोजी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

'श्रवणोत्तर स्विकृत'

Digitally signed by
ANUPAMA
CHANDRASHEKHAR
PARSHETTI
Date: 2025.12.12
12:08:25 +0530

**( श्रीमती अनुपमा चं. पारशेट्टी )**

दिनांक – ११/१२/२०२५

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र. १, राहुरी.